पोलीस आयुक्त , छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय,
मिलकॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छ.संभाजीनगर- ४३१ ००१.
दुरध्वनी क्रमांक ०२४०-२२४०५९१,फॅक्स क्र.०२४०-२२४०५९६
ई मेल :- ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

गोपनिय जा.क्र.विशा-३/आदेश/छ. संभाजीनगर/२०२४ - 5815 छ. संभाजीनगर,दि.26 १२/२०२४

## भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ अंतर्गत आदेश.

**आदेश :-**

१. ज्याअर्थी, दहशतवादी /राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट पॅराग्लायडरचा वापर करून त्यांच्या हल्ल्यांमध्ये आणि त्याद्वारे व्हीव्हीआयपींना लक्ष्य करू शकतात, मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करू शकतात आणि छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था बिघडवू शकतात.

२. त्याअर्थी अशा ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडरद्वारे संभाव्य घातपात रोखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयात अशा घटकांच्या कारवाया, ज्यासाठी काही प्रतिबंधात्मक आणि सक्रिय उपाययोजना करणे आवश्यक आहे.

३. म्हणून मी, **प्रविण पवार, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर** आणि कार्यकारी दंडाधिकारी मला कलम १६३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांद्वारे, ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर्स, पॅरा मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स हॉट एअर बलून इत्यादी च्या उड्डाण क्रियांना छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रांत प्रतिबंध करण्याचे आदेश पुढील ६० दिवसांसाठी म्हणजे ३१/१२/२०२४ ते ३०/०२/२०२५ पर्यंत देत आहे. छत्रपती संभाजीनगर पोलीसांकडून हवाई पाळत ठेवणे किंवा पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्या लेखी विशिष्ट परवानगीने करण्यात येणारी कारवाई अपवाद राहील.

४. हा आदेश दि.३१/१२/२०२४ रोजी ००.०१ पासून दिनांक ३०/०२/२०२५ रोजी २४.०० वाजेपर्यंत. त्यापूर्वी मागे घेतल्याशिवाय लागू राहील.

५. या आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम २२३ अन्वये दंडनीय असेल.



आक्र/मनपा/सगणक/1
दि. 01 / 01 /2025

आ.क्र./उपआ-६/मनपा/ 799
दिनांक. 31-12-2024

आवक क्र.मनपा/मुख्य आवक-जावक विभाग/2024/ 7298
दिनांक 26/12/2024

६.सर्व संबंधितांना वैयक्तिकरित्या नोटीस बजावली जाऊ शकत नसल्यामुळे, यादवारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितीसाठी प्रसार माध्यमादवारे आणि सर्व पोलीस ठाणे, सर्व स.पो.आ., सर्व पो.उप.आ., महानगरपालिका बॉर्ड ऑफिस, तहसील ऑफिसच्या नोटिस बोर्डवर प्रती चिकटवून प्रकाशित केले जाईल.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक दि. 25/१२/२०२४ रोजी दिला आहे.

COMMISSIONER OF POLICE CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

**( प्रविण पवार ) भा.पो.से.**
पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर

प्रति :-

१)सर्व पोलीस उप-आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
२)सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
३)सर्व पो.स्टे./शाखा प्रभारी अधिकारी,नियंत्रण कक्ष,छत्रपती संभाजीनगर

प्रतिलिपी :-

१)विभागीय आयुक्त,छत्रपती संभाजीनगर
२)जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर
३)म.न.पा.आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
४)उपायुक्त,राज्य गुप्तवार्ता विभाग, छत्रपती संभाजीनगर
५)जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर
६)केंद्र संचालक,आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर
७)सोशल मिडीया,गुन्हे शाखा, छत्रपती संभाजीनगर
८)शासकीय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर
९) भारतीय विमानपतन प्राधिकरण , छत्रपती संभाजीनगर